THANE POLICE COMMISSIONERATE

जनसंपर्कअधिकारीकार्यालय, ठाणे शहर
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279

प्रेस नोट क्रमांक – दिनांक– ११/०७/२०२५

प्रेसनोट

'' अल्पवयीन मुलीचा खुनाच्या गुन्हयातील आरोपी वागळे क्राइम ब्रँच, युनिट ५ ठाणेकडुन जेरबंद''

कासारवडवली पो.स्टे गुन्हा नोंद क्रमांक ६५५/२०२५ कलम १०३,२३८ भारतीय न्याय संहिता-२०२३ प्रमाणे गुन्हा दि.०५/०७/२०२५ रोजी दाखल असुन सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, घटक ५, वागळे, ठाणे कडुन करण्यात येत होता. नमुद गुन्हयाचे तपासादरम्यान सदर अल्पवयीन मुलीचे अपहरण झाले बाबत कळवा पो.स्टे येथे गुन्हा नोंद क्रमांक ५९२/२०२५ कलम १३७(२) भारतीय न्याय संहिता-२०२३ प्रमाणे गुन्हा दि.०५/०७/२०२५ रोजी नोंद असल्याची माहिती प्राप्त झाली.

सदर गुन्हयाचा सखोल तपास करण्याकरीता व.पो.निरी सलील भोसले यांनी सपोनिरी शरद पाटील,स.पो.उप.निरी/राजेंद्र चौधरी,पो.ना/४१२१ बंडगर,पो.ना/७१५९ तेजस ठाणेकर,पो.शि/ ७५४ यश यादव,असे एक पथक तयार केले. सदर पथकाने नमुद मयत अल्पवयीन मुलगी दि.०४/०७/२०२५ रोजी रहाते घरातुन निघुन गेली त्यावेळीपासुन सी.सी.टी.व्ही फुटेजची तपासणी केली असता नमुद मुलगी ही घरातुन निघुन ठाणे रेल्वे स्टेशन येथील रिक्षा स्टॅण्ड येथे आल्याचे दिसुन आले. त्याप्रमाणे अधिक माहिती घेतली असता सदरची अल्पवयीन मुलगी ही एका रिक्षात बसुन गेल्याचे दिसून आले सदर माहितीच्या अनुषंगाने केलेल्या तांत्रीक तपासामध्ये रिक्षा चालकाचा गुन्हयातील सहभाग असल्याचे आढळुन आले. त्याप्रमाणे सदर रिक्षाची माहिती घेवुन रिक्षाचालक समाधान अर्जुन सुर्यवंशी, वय ४० वर्षे, व्यवसाय-ऑटो रिक्षा चालक, रा. सुखशांती चाळ, आंबेडकर पुतळयाचे जवळ, लोकमान्यनगर, पाडा नं.३, ठाणे पश्चिम याचेकडे अधिक तपास केला असता त्याचा गुन्हयातील सहभाग निषन्न झाल्याने त्यास दि.१०/०७/२०२५ रोजी ताब्यात घेतले. सदर गुन्हाचा पुढील तपास कासारवडवली पो.स्टे कडुन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस उपआयुक्त गुन्हे श्री. अमरसिंह जाधव यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा पोलीस आयुक्त शोध १ गुन्हे श्री.शेखर बागडे, गुन्हे शाखा घटक ५ वागळे ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सलील भोसले, पोलीस निरीक्षक नितीन पाटील, सहा.पोलीस निरीक्षक भुषण शिंदे, सहा.पोलीस निरीक्षक पल्लवी ढगेपाटील, सहा. पोलीस निरीक्षक शरद पाटील, पोउपनिरी तुषार माने, स.पो.उप.निरी/चौधरी, पो.हवा/४५२९ निकम, पोहवा/३६३३ शिंदे, पोहवा/४३१५ कार्ले, पोहवा/३५९३ रावते, पोहवा/२२२८ पालांडे, पोहवा/३५५५ काटकर, पो.हवा/२६९९ पाटील, पो.हवा/३९६७ जाधव, मपोहवा/६६९७ गिते, मपोहवा/७४६७ महाले, पो.ना/७२८ गार्डे, पोना/४१२१ बंडगर, पोना/७१५९ ठाणेकर, पो.शि/२८५० शेडगे, पोशि/८०३३ शिकारे, पोशि/७५४ यादव,या पथकाने केली आहे.

———०००००———

PDF Scanner ACE Scanner